असा. क्र. १

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, जानेवारी ६, १९९८/पौष १६, शके १९१९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग एक-अ—मध्य उप-विभाग

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जानेवारी १९९८

आदेश

भारतीय संविधान,

क्रमांक एसईसी/जीईएन-१११८/प्र.क्र. १/का-३.–ज्याअर्थी, भारतीय संविधानातील कलम २४३-झेडए नुसार राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, नगरपालिकांच्या निवडणुका मुक्त, निर्भय व शांत वातावरणात पार पाडण्याची व निवडणूक प्रक्रियेची शुद्धता अथवा पावित्र्य राखण्याची राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे.

आणि ज्याअर्थी, नगरपालिकांच्या निवडणूकामध्ये मतदानाच्या दिवशी उमेदवारांनी, त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींनी, तसेच राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्ते यांनी किती वाहने वापरावीत याबाबत नगरपालिका निवडणुकांच्या संदर्भात असलेल्या अधिनियमांमध्ये अथवा निवडणूक नियमांमध्ये काहीही उल्लेख नाही. यास्तव, त्या बाबतीत आवश्यक त्या सूचना संबंधितांना देणे आवश्यक तर आहेच पण निवडणुका मुक्त, निर्भय, शांत व स्वच्छ वातावरणात होण्याच्या दृष्टीने उपयुक्त होणार आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या कलम २४३-झेडए व मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १८अ(४) नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २) चे कलम ९-ब (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) चे कलम १४(४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) चे कलम १०-अ (४) खाली व इतर सर्व प्राप्त अधिकारांचा वापर करून मी दे. ना. चौधरी, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

१. महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकांमध्ये निवडणूक लढविणारा उमेदवार, स्वतः (यात स्वतः उमेदवार किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा तिचा अभिकर्ता यांचा समावेश राहील) तसेच त्याचे निवडणूक प्रतिनिधी, संबंधित राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्ते यांना सर्वांना मिळून मतदानाच्या दिवशी फक्त एकच वाहन वापरण्यास अनुमती देण्यात येईल व त्याबाबतची कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील :—

328

(अ) महानगरपालिका/नगरपपरिषदा यांच्या निवडणुकांच्या संदर्भात मतदानाच्या दिवशी अशात-हेने वाहन वापरण्याच्या दृष्टीने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने त्याबाबतची मागणी संबंधित महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांचेकडे लेखीपत्राद्वारे मतदानाच्या दिवसापूर्वी कमीत कमी १ आठवडा करावी.

(ब) अनुमती मागणारे पत्र प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी तशा आशयाची लेखी अनुमती संबंधित उमेदवारास द्यावी. तसेच "........... महानगरपालिका/नगरपरिषद निवडणूक परवाना " असे संबंधित उमेदवाराचे नाव व त्याच्या प्रभाग क्रमांकाच्या तपशिलासह छापील परवानापत्र आपल्या सही-शिक्यासह संबंधित उमेदवारास देण्यात यावे. तसेच सदर परवानापत्र मतदानाच्या दिवशी संबंधित वाहनाच्या दर्शनी बाजूस काचेवर लावण्याची सक्त सूचना द्यावी.

(क) महानगरपालिका अथवा नगरपरिषद निवणुकांमध्ये मतदानाच्या दिवशी संबंधित प्रभागामध्ये फिरणाऱ्या वाहनाच्या संदर्भात असा परवाना त्याने सक्षम अधिकाऱ्याकडून मिळविला आहे किंवा कसे याची तपासणी करण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यास तसेच पोलीस अधिकाऱ्यास राहतील.

(ड) सदर वाहनाचा वापर मतदारांना मतदान केंद्रावर किंवा मतदान केंद्राच्या जवळपास आणण्या-नेण्यासाठी करता येणार नाही.

(इ) जे उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी, राजकीय पक्षांचे नेते अथवा कार्यकर्ते उपरोक्त विहित परवाना न घेता मतदानाच्या दिवशी वाहनात बसून संबंधित प्रभागामध्ये फिरत असताना आढळतील तर त्यांनी निवडणुकीसंदर्भात भ्रष्ट आचरण केले आहे तसेच मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यासाठी अशा वाहनांचा वापर केला जात आहे असे समजण्यात येईल आणि निवडणुकीचे पावित्र्य राखण्यासाठी असे वाहन जप्त करण्याचे अधिकार संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तसेच पोलीस अधिकारी यांना राहतील.

(ई) वरील आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस ३ महिनेपर्यंत कारावासाची शिक्षा अथवा रुपये ५०० पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतील.

२. महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकांमध्ये एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रभागांमधून जरी नामनिर्देशनपत्रे भरली असतील तरी तो उमेदवार, त्याचे निवडणूक प्रतिनिधी, राजकीय पक्षाचे नेते व कार्यकर्ते यांना सर्वांना मिळून मतदानाच्या दिवशी फक्त एकच वाहन वापरता येईल.

**दे. ना. चौधरी,**
राज्य निवडणूक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.